# ★★★★★ आपले परमवीर ★★★★★

पुरातन काळातील वीर पुरुषांच्या असामान्य पराक्रमांच्या कथा तुम्ही ऐकल्या असतील; पण आपल्या सर्वांच्या सुरक्षिततेसाठी स्वतःच्या प्राणांची आहुती देणारे शूर सैनिक आजही आपल्या देशात आहेत. त्यांच्या अतुलनीय शौर्याला वंदन करण्यासाठी त्यांना सन्मानपदके देऊन गौरवले जाते.

'परमवीर चक्र' हा भारताचा सर्वोच्च लष्करी सन्मान आहे. जमिनीवर, समुद्रात किंवा आकाशात शत्रू समोर उभा ठाकलेला असताना केवळ अजोड असे धाडस, शौर्य दाखवणाऱ्या, आत्मसमर्पण करणाऱ्या वीरांना तो प्रदान केला जातो. 'परमवीर चक्र' हा फार दुर्लभ सन्मान आहे. आतापर्यंत फक्त एकवीस वेळाच हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. त्यातील चौदा वीरांना तर तो मरणोत्तर देण्यात आला आहे.



'परमवीर चक्र' पदक दिसायला अगदी साधे आहे. कांस्य धातूपासून बनवलेले, छोट्या आडव्या दांडीवर सहज फिरेल असे. गडद जांभळी कापडी पट्टी हे त्याचे वैशिष्ट्य. पदकाच्या दर्शनी बाजूला मधोमध भारताचे राष्ट्रीय बोधचिन्ह आहे. पदकाच्या मागच्या बाजूला परमवीर चक्र हे शब्द इंग्रजी आणि हिंदीत गोलाकार कोरलेले आहेत. त्यांच्या मधे दोन कमलपुष्पे आहेत.

'परमवीर चक्र' पदकाचे डिझाइन सावित्रीबाई खानोलकर यांनी तयार केले. त्या मूळच्या युरोपियन; परंतु भारतीय सेनेतील एक अधिकारी विक्रम खानोलकर यांच्याशी विवाह करून त्या भारतात आल्या. या देशावर त्यांचे प्रचंड प्रेम. त्यांनी भारतीय नागरिकत्व तर घेतलेच, शिवाय भारतातील कला, परंपरांचाही खूप अभ्यास केला. मराठी, संस्कृत, हिंदी या भाषा त्या अस्खलितपणे बोलत असत.

इंद्रवज्र म्हणजे विजेचा कडाडणारा प्रहार. हे एक अजोड, अजिंक्य असे शस्त्र समजले जाते. दधीची ऋषींच्या परमोच्च त्यागामुळे हे शस्त्र अमोघ झाले आहे.

इंद्रवज्र कसे तयार झाले त्याविषयीची एक दंतकथा अशी : हजारो वर्षांपूर्वी एका राक्षसाने जगातले सगळे पाणी पळवून नेले. निष्पाप माणसे पाण्यावाचून तडफडू आणि मरू लागली. या राक्षसावर कोणत्याच साध्यासुध्या शस्त्राचा परिणाम होईना- मग ते लाकडाचे असो, नाहीतर धातूचे. त्याला हरवेल असे अमोघ शस्त्र बनवण्यासाठी काहीतरी दिव्य पदार्थ हवा होता. तो कुठे मिळणार ? दधीची ऋषींच्या हाडांमध्ये असे दिव्य सामर्थ्य होते आणि दधीची ऋषींचे मानसिक सामर्थ्यही तेवढेच मोठे होते. लोकांच्या कल्याणासाठी त्यांनी स्वतःच आपल्या प्राणांची आहुती दिली आणि आपल्या अस्थींचे दान केले. या अस्थींतूनच तळपणारे इंद्रवज्र तयार झाले. राक्षसाचे निर्दालन झाले.

दधीची ऋषींच्या अस्थींमुळे इंद्रवज्राला सामर्थ्य मिळाले. तसेच अमोघ सामर्थ्य भारतीय सेनेला मिळते, ते या परमवीरांकडून, त्यांच्या शौर्यातून, त्यांच्या अत्युच्च अशा बलिदानातून !

## २१ महान परमवीर

- ★ मेजर सोमनाथ शर्मा
- ★ लान्सनाईक करम सिंग
- ★ सेकंड लेफ्टनंट राम राघोबा राणे
- ★ नाईक जदुनाथ सिंग
- ★ कंपनी हवालदार मेजर पीरू
- ★ कॅप्टन गुरूबचन सिंग सलारिया
- ★ मेजर धन सिंग थापा
- ★ सुभेदार जोगिंदर सिंग
- ★ मेजर शैतान सिंग
- ★ कंपनी क्वॉर्टर मास्टर हवालदार अब्दुल हमीद
- ★ लेफ्टनंट कर्नल अर्देशीर बुरसोरजी तारापोर
- ★ लान्स नाईक अल्बर्ट एक्का
- ★ सेकंड लेफ्टनंट अरूण क्षेत्रपाल
- ★ मेजर होशियार सिंग
- ★ नायब सुभेदार बाना सिंग
- ★ मेजर रामस्वामी परमेश्वरन्
- ★ लेफ्टनंट मनोज कुमार पांडे
- ★ ग्रेनेडियर योगेन्द्र सिंग यादव
- ★ रायफल मॅन संजय कुमार
- ★ कॅप्टन विक्रम बत्रा
- ★ फ्लाईंग ऑफिसर निर्मलजीत सेखाँ

## फ्लाईंग ऑफिसर निर्मलजीत सिंग सेखाँ
## १०८७७ एफ (पी), पीवीसी.
### स्कॉड्रन नं. १८ : दी फ्लाईंग बुलेट्स



१४ डिसेंबर १९७१ रोजी शत्रूची सहा सेबर जेट विमाने श्रीनगर हवाईक्षेत्राकडे हल्ला करण्यासाठी झेपावली. तेथे नियुक्तीवर असणारे फ्लाईंग ऑफिसर निर्मलजीत सेखाँ सावध होतेच; पण धावपट्टीवर अचानक उडलेल्या धुराळ्यामुळे त्यांना उड्डाण करता येईना. धावपट्टी थोडी दिसू लागेपर्यंत शत्रूची विमाने माथ्यावर, अगदी खालून घोंगावू लागली होती, गोळ्यांच्या फैरी झाडत होती. तरीही प्राणाची पर्वा न करता फ्लाईंग ऑफिसर सेखाँचे नॅट विमान क्षणार्धात वर झेपावले. त्यांनी हल्लेखोर सेबर जेट विमानांचा प्रतिकार जोमाने सुरू केला. पाहता पाहता दोन विमानांचा त्यांनी अचूक वेध घेतला. जमिनीपासून फार थोड्या उंचीवर शत्रूच्या अधिक शक्तिशाली विमानांनी वेढले असताना निकराची लढाई त्यांनी चालूच ठेवली. शत्रू संख्येने जास्त होते; पण त्यांच्या या धाडसी हल्ल्याला पाठ दाखवून पळून गेले. श्रीनगर शहर आणि हवाईक्षेत्र बचावले.

परंतु हाय ! या भीषण युद्धात फ्लाईंग ऑफिसर सेखाँचे विमानही कोसळले आणि त्यांनी आपले प्राण गमावले.

फ्लाईंग ऑफिसर सेखाँना मृत्यू प्रत्यक्ष समोर दिसत होता, मात्र त्याही परिस्थितीत कमालीचे उड्डाण कौशल्य वापरून प्रचंड निर्धाराने ते शत्रूला सामोरे गेले. कर्तव्य म्हणून नव्हे तर असामान्य धैर्याने ते लढले. परमवीर फ्लाईंग ऑफिसर सेखाँ यांना सलाम !

---

देशसेवेसाठी प्राणांचे मोल देणाऱ्या या परमवीरचक्रधारकांची माहिती www.paramvirchakra.com. या इंटरनेटवरील संकेतस्थळावर जरूर वाचा. हे परमवीर विविध जातीधर्माचे आहेत असे तुम्हांला दिसेल.

आपल्या जखमा आणि प्राणांतिक वेदनांची पर्वा न बाळगता परमवीरांनी शत्रूशी दोन हात कसे केले, त्यांच्या प्रेरक, स्फूर्तिदायक हकिकती जरूर मिळवा आणि वाचा.



## स्वाध्याय

**प्र. १. दोन–तीन वाक्यांत उत्तरे लिहा.**

(अ) फ्लाईंग ऑफिसर निर्मलजीत सेखाँ सावध का होते?

(आ) फ्लाईंग ऑफिसर निर्मलजीत सेखाँना उड्डाण करण्यात कोणती अडचण होती?

(इ) निर्मलजीत सेखाँनी निकराची लढाई चालू का ठेवली?

(ई) निर्मलजीत सेखाँनी श्रीनगर शहर आणि हवाईक्षेत्राचा बचाव कसा केला?

(उ) दधीची ऋषींनी लोककल्याणासाठी कोणता त्याग केला?

**प्र. २. फ्लाईंग ऑफिसर निर्मलजीत सेखाँ हे शत्रूशी धैर्याने लढले. त्याचे पाच–सहा वाक्यांत वर्णन करा.**

**प्र. ३. परमवीरचक्रधारकांची माहिती वाचून आपल्याला कोणती प्रेरणा व स्फूर्ती मिळते?**

**प्र. ४. आपले परमवीर व दधीची ऋषी यांच्यात तुम्हांला कोणते साम्य आढळते?**

**प्र. ५. परमवीर चक्राची माहिती खालील मुद्द्यांनुसार लिहा.**

परमवीर चक्र

- धातू
- कापडी पट्टीचा रंग
- पदकाची दर्शनी बाजू
- पदकाची मागची बाजू
- पदकावरील कोरलेले शब्द
- भाषा
- पुष्प

**प्र. ६. परमवीर चक्र पदकाचे डिझाइन तयार करणाऱ्या सावित्रीबाई खानोलकर यांची सहा–सात वाक्यांत माहिती लिहा.**

### खेळूया शब्दांशी.

**(अ) खालील शब्दसमूह व वाक्प्रचार यांचा वाक्यांत उपयोग करा.**

(अ) घोंगावणे.

(आ) झेपावणे.

(इ) वेध घेणे.

(ई) वेढणे.

(उ) बचावणे.

(ऊ) सामोरे जाणे.

**(आ) समानार्थी शब्द लिहा.**

(अ) सावध

(आ) लढाई

(इ) प्रत्यक्ष

(ई) शत्रू

AUVB2E

**उपक्रम :** (१) परमवीर चक्र मिळालेल्या २१ महान परमवीरांच्या नावांचा तक्ता करा. वर्गात लावा.

(२) परमवीर चक्राचे चित्र काढा, रंगवा.

**प्रकल्प :** आंतरजालावरून आपल्या परमवीरांची चित्रे मिळवा. चित्र, नाव व पाच–सहा वाक्यांत त्यांची माहिती या पद्धतीने चिकटवही बनवा.

## आपण समजून घेऊया.

- खालील वाक्ये वाचा.

१. **जो** लवकर उठतो **तो** निरोगी राहतो.

२. **जिला** तालबद्ध उड्या मारता येतात, **तिला** लेझीम संघात सहभाग घेता येईल.

वरील वाक्यांतील जो-तो, जिला-तिला ही संबंधी सर्वनामे आहेत.

- खालील वाक्यांतील संबंधी सर्वनामे अधोरेखित करा.

१. ज्यांनी बचत केली, त्यांनी आपले भविष्य सुरक्षित केले.

२. ज्याला खुंटावरचा खो खो खेळता येतो, त्याला गोल खो खो खेळता येतोच.

३. जे दुसऱ्याला मदत करतात, ते लोकप्रिय होतात.

- खालील वाक्ये वाचा. अधोरेखित केलेली सर्वनामे पाहा.

१. हा मुलांचा संघ कोणाचा ?

२. ही फुलांची माळ सुहासने बनवली.

३. हे क्रिकेटचे मैदान खूप मोठे आहे.

४. तो यशवंतरावांचा मुलगा आहे.

५. ती माझी मैत्रीण आहे.

६. ते सर्व खेळाडू आहेत.

७. तिला कोणी मदत केली ?

८. तुला खायला काय बनवू ?

९. हा रुमाल कोणाचा आहे ?

**हा, ही, हे, तो, ती, ते** ही दर्शक सर्वनामे आहेत. **हा, ही, हे** या शब्दांनी जवळची, तर **तो, ती, ते** या शब्दांनी दूरची वस्तू, पदार्थ किंवा प्राणी दाखवला जातो.

**कोणी, काय, कोणाला** ही प्रश्नार्थक सर्वनामे आहेत. या प्रश्नांच्या उत्तरातून नामे मिळतात. ही नामांबद्दल आलेली सर्वनामे आहेत. त्यांच्या आधारे प्रश्न विचारता येतो.



## वाचा.

अनेक खेडी, गावे आणि शहरे या सर्वांचा मिळून देश बनतो. देशाला निश्चित सीमारेषा असते. या सीमारेषेच्या आत राहणारे लोक त्या देशाचे रहिवासी असतात. भारताच्या सीमारेषेत राहणारे आपण सर्व भारतीय म्हणून ओळखले जातो.

राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व राजमुद्रा ही आपली राष्ट्रीय प्रतीके आहेत. आपल्या राष्ट्रध्वजात तीन रंग आहेत. ते तीनही रंग आपल्याला एक निश्चित संदेश देतात. 'जनगणमन' हे आपले राष्ट्रगीत आहे. त्यात भारतातील विविध प्रदेश, नद्या व पर्वत यांचे वर्णन केले आहे. राष्ट्रगीताचा आदर करणे हे आपले कर्तव्य आहे. सारनाथ येथील अशोक स्तंभाच्या आधारे भारताची राजमुद्रा तयार करण्यात आली आहे. राजमुद्रेतील सिंहाच्या चित्राखाली 'सत्यमेव जयते' हे वचन आहे. सर्व नाणी, नोटा, शासकीय पत्रे यांवर ही राजमुद्रा असते. राष्ट्राबद्दलचे प्रेम प्रतीकांमधून व्यक्त होते. राष्ट्रीय प्रतीकांमुळे एकात्मतेची भावना दृढ होते. भारतीयांमधील ऐक्यभावना देशाच्या प्रगतीला हातभार लावते.